**जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट**
**प्रशासन विभाग**

जेएनपी/प्रशा./पी एंड आयआर/एसव्हीआरएस-जेएनपीटी/2021/12 तारीख: 01/09/2021

**परिपत्रक**

केंद्रीय बंदरे, नौकानयन व जलमार्ग मंत्रालयाच्या दिनांक 13.11 .2020 च्या पत्र क्रमांक एलबी - 16016/4/2014-एल द्वारा जारी केलेल्या मानक मार्गदर्शक तत्वांनुसार जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टने सर्व पात्र कर्मचाऱ्यांसाठी विशेष स्वेच्छानिवृती योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

**1. शीर्षक :**

यापुढे या योजनेस 'जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट विशेष स्वेच्छानिवृत्ती योजना - 2021 (जेएनपीटी-एसवीआरएस - 2021)' म्हटले जाईल.

**2. पात्रता :**

ज्या बंदर कर्मचाऱ्यांनी नोटीस कालावधी पूर्ण होण्याच्या तारखेला आपल्या सेवेची 10 वर्षे व वयाची 40 वर्षे पूर्ण केली आहेत अशा कर्मचा-यांसाठी ही योजना लागू असेल.

**3. खालील कर्मच्या-यांसाठी योजना लागू असणार नाही :**

क) आकस्मिक/करार तत्वावर नियुक्त कर्मचारी, जर असेल तर;

ख) इतर संस्थांकडून प्रतिनियुक्तीवर आलेले कर्मचारी;

ग) इतर संस्थांमध्ये प्रतिनियुक्त कर्मचारी ज्यांनी त्या संस्थांमध्ये कायमस्वरूपी आमेलन (absorption) चा पर्याय निवडला आहे.

**4. विशेष स्वेच्छानिवृती योजना - 2021 ची प्रमुख वैशिष्ट्ये :**

(क) विशेष स्वेच्छानिवृती योजना सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अर्थात दि.01.09.2021 ते दि.28.02.2022 पर्यंत लागू असेल ज्यामध्ये नोटीस कालावधी समाविष्ट आहे. विशेष स्वेच्छानिवृत्ती योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या कोणत्याही पात्र कर्मचाऱ्यांना विशेष स्वेच्छानिवृती योजनेसाठी आपला विनंती अर्ज ऑनलाईन करावा लागेल आणि स्वाक्षरी केलेली हार्ड कॉपी रिपोर्टिंग अधिकाऱ्यामार्फत संबंधित विभागाच्या प्रमुखांना सादर करावी लागेल. ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी जेएनपीटीच्या अंतर्गत नेटवर्क वर vms.jnport.com:9092 लिंक उपलब्ध आहे.

(ख) नोटीस कालावधी पूर्ण होण्यापूर्वी कर्मचारी आपला विशेष स्वेच्छानिवृती योजनेचा अर्ज मागे घेऊ शकतात.

(ग) विशेष स्वेच्छानिवृत्ती योजनेसाठी प्राप्त विनंती अर्ज स्वीकार/अस्वीकार करण्याचा अंतिम अधिकार व्यवस्थापनाचा असेल. लेखी कारणे देवून कोणताही अर्ज स्वीकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार व्यवस्थापनाकडे आहे. विशेष स्वेच्छानिवृत्ती योजना अर्जांची स्वीकृती व्यवस्थापनाच्या निर्णयावर आधारित असेल.

(घ) प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची व्यवस्थापना द्वारा छाननी केली जाईल आणि अर्ज स्वीकारणे किंवा नाकारणे या बाबत संबंधित कर्मचाऱ्यांस नोटीस कालावधीत कळवले जाईल.

(ङ) ज्यांचे अर्ज विशेष स्वेच्छानिवृत्ती योजनेसाठी मंजूर झाले असतील, ते सर्व कर्मचारी त्यांच्या स्वीकृती पत्रात नमूद केलेल्या तारखेस जेएनपीटीचे कर्मचारी म्हणून स्वेच्छानिवृत्त होतील.

**5.** विशेष स्वेच्छानिवृत्ती योजनेचे फायदे :

विशेष स्वेच्छानिवृत्ती योजनेचा लाभ घेणा-या कर्मचा-यांना जेएनपीटीच्या सेवेतून मुक्त होण्याच्या तारखेपासून (स्वीकृती पत्रानुसार) खालील अटी व शर्तीवर स्वेच्छानिवृत्त मानले जाईल. या योजनेतंर्गत सेवानिवृत्त होणा-या कर्मचारी खाली नमूद केलेल्या फायद्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही लाभासाठी पात्र असणार नाहीत :-

(क) विशेष स्वेच्छानिवृत्ती योजना भरपाई

i) विशेष स्वेच्छानिवृत्ती योजनेचा लाभ घेणारे कर्मचारी पूर्ण झालेल्या सेवेच्या प्रत्येक वर्षाच्या 1/½ महिन्यांच्या वेतनाच्या (मूळ वेतन अधिक महागाई भत्ता) समतुल्य सानुग्रह रकमेसाठी किंवा सेवेच्या शिल्लक महिन्यांसाठी देय वेतन मूल्य, पैकी जे कमी असेल; त्यास पात्र असतील.

ii) ज्यांची 30 वर्षांची सेवा पूर्ण झाली आहे, ते जास्तीत जास्त 60 (साठ) महिन्यांचे वेतन/वेतन भरपाई साठी पात्र असतील. हे शिल्लक सेवा कालावधीच्या वेतनापेक्षा अधिक नसेल (स्वेच्छानिवृतीच्या वेळी मासिक वेतनाच्या दराने).

**(ख) नोटिस कालावधी :**

कर्मचा-यांसाठी लागू सेवा शर्तीनुसार कर्मचा-यांना 3 महिन्यांची नोटीस द्यावी लागेल.

**(ग) कर्जाची परतफेड :** विशेष स्वेच्छानिवृत्ती योजनेचा लाभ घेणा-या कर्मचा-यांना जेएनपीटीतुन सेवामुक्त होणाऱ्या इतर कर्मचाऱ्यांना लागू निकषांनुसार सर्व थकित कर्जे/इतर देयकांची व्याजासह परतफेड करने आवश्यक आहे.

**(घ) इतर फायदे :** स्वेच्छानिवृत्ती घेणारे कर्मचारी या संदर्भात विद्यमान नियमांनुसार/ जेएनपीटी विनियमांनुसार इतर टर्मिनल लाभ उदा: भविष्य निर्वाह निधि (पीएफ) खात्यातील शिल्लक, जमा झालेल्या अर्जित सुट्ट्यांच्या समतुल्य रक्कम, उपदान (ग्रैचुइटी), पेन्शन, कम्युटेशनसाठी पात्र असतील.

(च) **<u>वैद्यकीय फायदे</u>**: जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (सेवानिवृत्ती) विनियम, 1995 सोबत पठित जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (सेवानिवृत्तीनंतर अंशदायी वैद्यकीय लाभ) विनियम, 1997 मध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय लाभ योजना समाविष्ट आहे. जर विशेष स्वेच्छानिवृत्ती योजनेचा पर्याय निवडलेला कर्मचारी उपर्युक्त वैद्यकीय योजनेच्या_व्यवहार्य पात्रता निकष पूर्ण करत असेल तरच तो/ती उपर्युक्त योजने अंतर्गत वैद्यकीय लाभ घेऊ शकेल.

6. **<u>अर्ज मंजूर करण्याचा/ नाकारण्याचा अधिकार:</u>**

**अर्ज मंजूर करण्याचा/ नाकारण्याचा अधिकार**: पात्रतेच्या निकषांची पूर्तता केल्यानंतर ही जेएनपीटी विशेष स्वैच्छिक सेवानिवृत्ति योजना- 2021 अंतर्गत कर्मचाऱ्यांना सेवामुक्त करण्याचा अधिकार व्यवस्थापनाचा असेल.

व्यवस्थापन अर्जांची छाननी केल्यानंतर लेखी कारणे दाखवून कोणताही अर्ज मंजूर करू किंवा नाकारु शकतो.

7. **<u>पुन: रोजगारावर निर्बंध:</u>**

उपर्युक्त योजनेअंतर्गत विशेष स्वेच्छानिवृत्ती योजनेचा पर्याय निवडलेल्या कर्मचारी पोर्ट क्षेत्रात पुन्हा नोकरीसाठी पात्र राहणार नाहीत. मात्र अशा कर्मचाऱ्यांनां सरकारी क्षेत्रात पुन्हा नोकरीसाठी कोणतेही बंधन राहणार नाही.

8 **<u>विशेष स्वैच्छिक सेवानिवृत्ति देण्याचे अधिकार</u>**:

विशेष स्वेच्छानिवृत्ती योजनेचा अर्ज मंजूर करण्याचा/ नाकारण्याचा सक्षम अधिकार जेएनपीटी अध्यक्षानां असेल.

9. **<u>आयकरात कपात:</u>**

उपर्युक्त योजनेअंतर्गत प्राप्त लाभांच्या संदर्भात आयकर देणी, जर असेल तर ते पूर्णपणे कर्मचाऱ्यांचे असेल आणि लागू आयकर नियमांनुसार स्त्रोतावर कापला जाईल.

10. **<u>ही योजना खालील कर्मचाऱ्यांना लागू होणार नाही</u>**:

i) ज्यांच्याविरुद्ध जेएनपीटी तर्फे शिस्तभंगाची कारवाई किंवा फौजदारी न्यायालयात खटला चालू आहे आणि शिस्तभंगाच्या कारवाईचा परिणाम म्हणून ज्यांची सेवा बरखास्त/संपुष्टात येण्याची शक्यता आहे.

ii) जेथे बड्तर्फी, सेवामुक्ती, सेवेची समाप्ती किंवा वर नियुक्ति धारणाधिकार गमावल्यामुळे कामावरून काढण्यात आले आहे.

iii) ज्यांनी जेएनपीटीची नोकरी सोडली आहे.

iv) जर कर्मचारी आणि जेएनपीटी यांच्यात कोणताही विवाद/केस प्रलंबित असेल आणि जोपर्यंत अशा प्रकरणांमध्ये स्वाक्षरी करणा-या कर्मचारीकडून कायदेशीररित्या केस मागे घेत नाही किंवा बंद केली जात नाही.

v) ज्यांची दक्षता मंजुरी (वीजीलन्स क्लिएरन्स) मिळाली नाही.

11. कर्मचारी निवास संबंधी जेएनपीटीच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी जेएनपीटी कर्मचारी (निवासी निवास वाटप) नियमांनुसार जे नियम व अटी असतील तेच नियम व अटी या योजनेअंतर्गत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी लागू असतील.

12. विशेष स्वेच्छानिवृत्ती योजने अंतर्गत सेवामुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आश्रित/नातेवाईक जेएनपीटी किंवा त्याच्या उपकंपन्या किंवा संयुक्त उपक्रम कंपन्यांमध्ये नोकरीसाठी कोणताही दावा करणार नाहीत.

13. कर्मचा-यास योजने अंतर्गत देय लाभाच्या सर्व दाव्यांचा निपटारा पूर्ण आणि अंतिम राहील (कर्मचाऱ्याच्या मृत्यु संबंधात कर्मचाऱ्याकडून नामनिर्देशित व्यक्तिस). या योजने अंतर्गत स्वेच्छानिवृत्त होणा-या कर्मचा-यास पुन्हा नोकरी किंवा नुकसान भरपाई किंवा इतर कोणत्याही प्रकारची सवलतीच्या बाबतीत जेएनपीटी विरुद्ध कोणताही दावा करता येणार नाही आणि त्याच्याकडून किंवा त्याच्या वतीने इतरांतर्फे कोणतीही मागणी किंवा विवाद उपस्थित केला जाणार नाही.

14. ही योजना विशेष, ऐच्छिक आणि वाटाघाटी करण्यायोग्य नाही आहे आणि हा हक्काचा विषय म्हणून मानला जाऊ शकत नाही. औद्योगिक विवाद अधिनियम, 1947 च्या तरतुदींनुसार हा कोणत्याही औद्योगिक वादाचा विषय होणार नाही आणि भविष्यात उदाहरण, प्रथा, परंपरा, वापर किंवा रीत आणि वेळ म्हणून उद्धृत केले जाणार नाही.

15. असे समजले जाईल की जेएनपीटी विशेष स्वेच्छानिवृत्ती योजना - 2021 ची निवड करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी योजना आणि त्यातील सर्व अटी व शर्ती पूर्णपणे समजून घेतल्या नंतर सेवानिवृत्ति का पर्याय निवडला आहे आणि सर्वसमावेशक पॅकेज आधारावर त्यात नमूद केलेल्या अटींचे पूर्णपणे पालन करण्यास सहमती दर्शविली आहे.

**(जयवंत बी. ढवळे)**
**मुख्य व्यवस्थापक (प्रशासन) आणि सचिव**